''स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड सामाजिकशास्त्र विद्याशाखेन्तर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करण्यात येणारा शोधप्रबंधाचा आराखडा''

:: संशोधनाचा विषय ::

''भारताच्या आर्थिक विकासात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान : एक विश्लेषनात्मक अभ्यास''

संशोधक

महादेव तुळशिराम मस्के

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.स्वामी एस.डी.

अर्थशास्त्र विभाग,

श्री दत्त कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, हदगाव जि. नांदेड

ऑगस्ट २०१६

१. प्रस्तावना :

भारत या देशामध्ये अनेक आर्थिक विचारवंत होऊन गेले. त्यामध्ये अग्रगण्य नावे राजा छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहु महाराज, महात्मा ज्योतीबा फुले यांनी भारताच्या विकासाबाबत आपला दृष्टीकोन विशद केला. शेती सुधारणा, जलव्यवस्थापन, अस्पृश्यता निवारण, लघु व कुटीर उद्योगाचा विकास, दारिद्र्य, बेरोजगारी या प्रश्नांना सोडविण्याचा प्रयत्न प्रामुख्याने केला.

आर्थिक विचारांची कास पुढे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सतत आपल्या अभ्यासातून मांडली. डॉ.बाबासाहेबांची मुलगामी भूमिका अर्थतज्ज्ञाची होती. त्यांची जगविख्यात अर्थशास्त्र ग्रंथसंपदा व त्यांची सर्व सामाजिक चळवळींना असलेली आर्थिक तत्वज्ञानाची बैठक यावरून याचा प्रत्यय येतो. भारतासारख्या विकसनशील देशाला लागू पडतील असे आर्थिक विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे अष्टपैलू व्यक्तीमत्व असल्यामुळे त्यांना अनेक विषयांचे ज्ञान होते. त्यांनी देशाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी व सामाजिक, आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी सतत प्रयत्न केले आहेत. ग्रामीण भागात सामाजिक न्याय प्रस्थापित झाला पाहिजे. सामाजिक न्याय म्हणजे सर्व जनतेचे कल्याण होणे हा अर्थ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत होता. आधुनिक जागतिक स्पर्धेत टिकून राहावयाचे असेल तर डॉ.बाबासाहेबांच्या आर्थिक विचारावर आधारीत अर्थव्यवस्थेची बांधणी करावी लागेल.

२. समस्या सुत्रण :

प्रस्तुत संशोधनामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचा बारकाईने अभ्यास केला जाणार आहे. त्यांचे आर्थिक विचार देशाच्या अर्थव्यवस्थेला विकासासाठी कसे महत्त्वाचे आहेत, याचा अभ्यास करण्यात येणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आजच्या परिस्थितीत लागू पडलीत का? त्यांच्या विचाराने कृषी, औद्योगिक क्षेत्राचा विकास होईल का? चलन विषयक समस्या सोडविता येईल का? दारिद्र्य व बेरोजगारी यांचे प्रमाण कमी करता येईल का? राहणीमानाची पातळी उंचावता येईल का? आर्थिक विषमता कमी करता येईल का? या प्रश्नांचा बारकाईने अभ्यास करणे हा ह्या अध्ययनामागचा हेतू आहे.

३. संशोधनाची उद्दिष्टे :

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचे अध्ययन करणे.

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृषी विषयक विचारांचे अध्ययन करणे.

३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चलनविषयक विचारांचे अध्ययन करणे.

४. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे अध्ययन करणे.

संशोधनाची गृहितके :

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी विषयक विचार देशातील शेती विकासासाठी महत्त्वाचे ठरत आहेत.

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारामुळे देशातील आर्थिक विषमता कमी होत आहे.

३. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या औद्योगिक धोरणामुळे औद्योगिक क्षेत्राचा विकास होत आहे.

४. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारामुळे ग्रामीण भागातील राहणीमान उंचावण्यास मदत झाली आहे.

५. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील रोजगारात वाढ झाली आहे.

५. संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्राथमिक व द्वितीय सामग्रीचा वापर करण्यात येईल. द्वितीय साधनसामग्रीत ज्या ज्या तज्ज्ञ व्यक्तीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचे अध्ययन केले आहे त्यांचा उपयोग केला जाईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मुळ ग्रंथ उपयोगात आणले जातील. तसेच सांख्यकिय माहितीसाठी राष्ट्रीय नमुना सर्व्हेक्षण या शिवाय संकेतस्थळ, वृत्तपत्र या प्रमुख साहित्याचा उपयोग केला जाईल.

सर्व सामान्य शेतकऱ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषी विषयक आर्थिक विचारांचा कितपत उपयोग झाला, पैशाचा प्रश्न सोडविल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली का? तसेच वरील उद्दिष्टे व गृहितके सिध्द करण्याच्या दृष्टिकोनातून प्रश्नावलीच्याद्वारे माहिती संकलीत केली जाईल. यादृच्छिक पध्दती आणि नमुना निवड पध्दतीचा वापर केला जाईल.

६. प्रकरण रचना :

१. प्रस्तावना.

२. पूर्व संशोधन साहित्याचा आढावा.

३. आर्थिक विचारांचे अध्ययन.

४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विकासातील योगदान.

५. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा तुलनात्मक अभ्यास.

६. प्रमुख निष्कर्ष व शिफारशी.

७. संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनात देशातील ग्रामीण तसेच शहरी भागातील एकंदर आर्थिक विकासाचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात येईल.

८. संशोधनाचे महत्त्व :

आज पर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर अनेक संशोधकांनी, तज्ज्ञांनी अभ्यास केलेला आहे. हा अभ्यास त्यांच्या प्रत्येक विचारावर जसे की, अस्पृश्यता निर्मुलन, जाती व्यवस्था, स्त्री-पुरूष समानता, सामाजिक न्याय अशा वेगवेगळ्या बाजूने त्यांच्यावर अभ्यास झाला आहे. पण त्यांच्या आर्थिक विचारावर फारसा अभ्यास झालेला नाही. त्यांचे आर्थिक विचार देशाच्या विकासासाठी अतिशय महत्त्वाचे आहेत. म्हणून प्रस्तूत संशोधनात भारताच्या आर्थिक विकासात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे.

९. संशोधनाची मर्यादा :

प्रस्तुत अध्ययन प्राथमिक व द्वितीय माहितीवर आधारीत आहे. प्राथमिक माहितीतील साहित्याचा अपुरेपणा, द्वितीय माहितीतील गुप्तपणा प्रचलित आकडेवारीचा अपुरेपणा ही या अध्ययनावरील मर्यादा राहील.

१०. संदर्भग्रंथ सूची:

१. विकासाचे अर्थशास्त्र, प्रा.पत्की आणि साबळे, पिंपळापुरे, १९९१, नागपूर.

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, शासकीय फोटो झिंको मुद्रणालय, १९९३, पुणे.

३. शिवाजी व शिवकाल, प्रा.डॉ.जयसिंगराव पवार, १९९५, फडके, कोल्हापूर.

४. उच्चतर आर्थिक सिध्दांत, एम.एल.झिंगण, वृंदा प्रकाशन, १९९७, दिल्ली.

५. शेतकऱ्यांचा आसुड, अशोक कौतिक कोळी, स्वरूप प्रकाशन, २०१०, औरंगाबाद.

६. रूपयाची समस्या त्याचे मुळ व त्यावरील उपाय, डॉ.सुभाष खांडरे, सुधीर प्रकाशन, २०१३, वर्धा.

७. योजना मासिक, ऑगस्ट २०१५.

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.स्वामी एस.डी.
अर्थशास्त्र विभाग
श्री दत्त कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय,
हदगाव जि.नांदेड

संशोधक

महादेव तुळशिराम मस्के